**स्थायी निदेश क्र. ९**

**नगरपरिषदांमार्फत पुरविल्या जाणा-या सेवा आर्थिकदृष्टया तुटीत असल्याने इतर तुट भरुन काढल्याचा अहवाल वार्षिक अर्थ-संकल्पासोबत सादर करणे.**

**नगरपरिषद प्रशासन संचालनालय.**
**गृहनिर्माण भवन (म्हाडा) तळमजला,**
**वांद्रे (पूर्व) मुंबई - ४०० ०५१.**
**क्र. संकीर्ण-२००१/प्र.क्र. २/२००१/८**
**दिनांक १५ जानेवारी २००१.**

प्रत्येक नगरपरिषदेमध्ये दरवर्षी अर्थसंकल्प कशा प्रकारे तयार केला जावा आणि कशा प्रकारे त्यास मान्यता दिली जावी, याबद्दलची तरतुद महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ खालील कलम १०१ मध्ये विहीत करण्यांत आलेली आहे. अर्थसंकल्पातील तरतुदी प्रस्तावित करताना आणि मंजूरीसाठी नगरपरिषदेकडे सादर करतांना मागील आर्थिक वर्षात -

१) पाणीपुरवठा व मलनि:सारण
२) गटारे साफ करणे, घन कच-याची वाहतुक आणि विल्हेवाट
३) नगरपरिषद परिवहन, व
४) रस्त्यांवरील दिवाबत्ती

या बाबींवर झालेला खर्च, या बाबींसंबंधी लावलेले कर आणि त्यावरुन मिळालेले उत्पन्न, खर्च आणि त्या उत्पन्नामध्ये राहिलेली तुट कशा प्रकारे भरुन काढण्यात आली याचा तपशील तसेच अशा प्रकारे ज्या सेवा पुरविण्यावर तुट भरुन काढण्यासाठी नगरपरिषदेच्या इतर उत्पन्नातुन अनुदान देण्यात आले असेल तर त्यांचा तपशील आणि अशा प्रकारच्या अनुदानाचा लाभ नगरपरिषदेमधील नागरीकांच्या कोणत्या घटकांना देण्यात आला आहे, याबद्दलचा अहवाल सादर करणे ही मुख्याधिका-यांची वैधानिक जबाबदारी आहे. या बद्दलची तरतुद कायद्यातील कलम १०१ (१ अ) खाली विहीत करण्यात आली आहे.

परंतु अलिकडे नगरपरिषदांच्या कामाचा आढावा घेतला असता आणि अर्थसंकल्प मंजुर करण्याच्या प्रक्रियेबद्दलची माहिती घेतली असता असे निदर्शनास आले आहे की-

१) या वैधानिक कर्तव्याकडे नगरपरिषदांच्या मुख्याधिका-यांनी पूर्णपणे दुर्लक्ष केले आहे आणि काही अपवाद वगळता नगरपरिषदांमध्ये अर्थसंकल्प सादर करताना कलम १०१ (१ अ) मधील तरतुदीनुसार अनुदानाचा अहवाल तयार केला जात नाही व अर्थसंकल्पासोबत सादर केला जात नाही.
२) अशा प्रकारे सादर करण्यात आलेला अहवाल संचालनालयास सादर केला जात नाही.
३) अशा प्रकारच्या अहवालासह जिल्हाधिका-याकडे अर्थसंकल्प सादर केला जात नाही आणि
४) असा अहवाल सोबत सादर केलेला नसतानाही जिल्हाधिका-यांकडून नगरपरिषदांच्या अर्थसंकल्पाना मंजुरी दिली जात आहे.

वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे होत असलेली कार्यवाही कायद्यातील तरतुदीप्रमाणे परिपूर्ण अशी नाही आणि त्यामुळे कोणकोणत्या नगरपरिषदांमध्ये कोणत्या सेंवांसाठी किती प्रमाणात खर्च व उत्पन्न यामध्ये तूट रहाते आणि ती तूट भरुन काढण्यासाठी नगरपरिषदांना आपापल्या इतर उत्पन्नातून किती प्रमाणात अनुदान खर्च करावा लागत आहे. अशा प्रकारची वस्तुनिष्ठ कल्पना समोर येत नाही त्यामुळे अशा सेवा आर्थिक दृष्टया स्वयंनिर्भर करण्यासाठी नागरीकांकडून घेतल्या जाणा-या करांमध्ये योग्य सुधारणा केली जात नाही.

याशिवाय कायद्यातील असलेल्या वैधानिक तरतुदींचे सर्रासपणे उल्लंघन होत आहे, असे स्पष्ट होते. नगरपरिषदेच्या कामामध्ये अशा प्रकारची उणिव यापुढे राहू नये याकरिता खालीलप्रमाणे स्थायी निदेश देण्यात येत

आहेत, त्यानुसार मुख्याधिका-यांनी आणि जिल्हाधिका-यांनी अर्थसंकल्प सादर करताना आणि अर्थसंकल्पाना मंजुरी देताना कटाक्षाने कार्यवाही करावी.

(अ) कायद्यातील कलम १०१(१ अ) प्रमाणे मुख्याधिका-यांनी दरवर्षी अपेक्षित अहवाल अर्थसंकल्पीय प्रस्तावासोबत सादर करण्याची दक्षता घ्यावी. अशा अहवालाचे नगरपरिषदेवर होणारे परिणाम व त्या अनुषंगाने करावयाची कार्यवाही याबाबत चर्चा करुन नगरपरिषदेने पुढील कामाकरीता कृती आराखडा ठरवावा आणि अर्थसंकल्प मंजुरीच्या ठरावात हा कृती आराखडा नमुद केला जावा.

(ब) सध्या वर्ष २००१-२००२ करिता तयार झालेले अर्थसंकल्प मंजुर करुन घेण्यापूर्वी वरील बाबींबद्दलचा अहवाल अजून मुख्याधिका-यांनी तयार करुन सादर केला नसेल तर नगरपरिषदांच्या अर्थसंकल्पास मंजूरी घेण्यापूर्वी सादर करण्याची दक्षता घ्यावी आणि अशा प्रकारचा अहवाल सोबत न जोडताच नगरपरिषदेची मंजूरी घेतली असल्यास तसा अहवाल नगरपरिषदेपुढे मुख्याधिक-यांनी फेरसादर करावा आणि मगच अर्थसंकल्प मंजूरीसाठी जिल्हाधिका-याकडे सादर करावा.

(क) कलम १०१(१ अ) प्रमाणे तयार करण्यांत आलेला अहवाल मुख्याधिका-यांनी नगरपरिषदेसमोर सादर केला नसल्यास जिल्हाधिका-यांनी अशा अर्थसंकल्पास मंजूरी देण्यापूर्वी तो अहवाल नगरपरिषदेपुढे सादर केला जाईल याची दक्षता घ्यावी व ही प्रक्रिया पूर्ण झाल्यावरच अर्थसंकल्पास मंजूरी ध्यावी.

(ड) १९९४ मध्ये संमत झालेल्या कायद्यातील दुरुस्तीनुसार आतापर्यंत ज्या मुख्याधिका-यांनी कलम १०१ (१ अ) प्रमाणे अभिप्रत असलेली कार्यवाही केली नसेल, चालू वर्षीही केली नसेल आणि यापुढे जर केली नाही तर त्यांचेविरुध्द शिस्तभंग विषयक कार्यवाही केली जाईल याची सर्व मुख्याधिका-यांनी आणि जिल्हाधिका-यांनी नोंद घ्यावी. आतापर्यंत ज्या मुख्याधिका-यांनी अर्थसंकल्प मंजूर करुन घेताना अशा प्रकारची कार्यवाही केली नाही त्या मुख्याधिका-यांविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्याचा प्रस्ताव जिल्हाधिका-यांनी माझ्याकडे दि. ३१.३.२००१ पर्यंत सादर करावा. त्याचप्रमाणे भविष्यात मुख्याधिकारी आपली वैधानिक जबाबदारी योग्यप्रकारे पार पाडतील याकडे जिल्हाधिका-यांनी विशेष लक्ष दयावें आणि कायद्यातील विहित करण्यांत आलेले असे वैधानिक कर्तव्य पार पाडण्यात कसूर केल्यास त्याबद्दलची नोंद त्यांचे गोपनीय अहवाल तयार करतांना घेण्यात यावी.

(भगवान सहाय)<br>
संचालक<br>
नगरपरिषद प्रशासन संचालनालय

प्रति,

१) अध्यक्ष, नगरपरिषद (सर्व)

२) मुख्याधिकारी, नगरपरिषद (सर्व)

३) जिल्हाधिकारी, (सर्व)

प्रत माहितीसाठी अग्रेषित -

१) विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपरिषद प्रशासन, सर्व